जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 JUN 2025
पुण्यनगरी

# सकारात्मक ऊर्जाप्राप्तीसाठी योगसाधना आवश्यक

## खा. धनंजय महाडिक; शिवाजी विद्यापीठात 'योग-संगम' कार्यक्रम

**कोल्हापूर :** सकारात्मक ऊर्जाप्राप्तीसाठी योगसाधना आवश्यक असून, भारताच्या पुढाकाराने ११ वर्षांपूर्वी सुरू झालेला आंतरराष्ट्रीय योग दिन जगभरात साजरा केला जात आहे, ही अभिमानाची बाब आहे, असे उद्गार खासदार धनंजय महाडिक यांनी काढले. शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित 'योग-संगम' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सुमारे ६५० योगसाधकांनी सहभागही दर्शवला.

शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये सकाळी ६.१५ ते ८.१५ या कालावधीत योगसाधना शिबिर झाले. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. शरद बनसोडे, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार आदींची प्रमुख उपस्थित होते. योगशिक्षक दत्ता पाटील, सूरज पाटील, वीणा मालडीकर, आसावरी कागवाडे यांनी प्रशिक्षण दिले.



शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित योग-संगम कार्यक्रमाचे रोपास पाणी घालून उद्घाटन करताना खासदार धनंजय महाडिक.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संदेशाने प्रारंभ**

पंतप्रधान मोदी यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विशाखापट्टणम येथून देशाला संबोधित केले. साऱ्या जगाला एका धाग्यात गुंफण्याची क्षमता योगामध्ये आहे. आरोग्य सुरक्षेसाठी दैनंदिन योगा करणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या भुकेपेक्षा दहा टक्के अन्न कमी सेवन केले, तर आरोग्य उत्तम राहील, तसेच अन्नधान्य आणि संसाधने यांची मोठी बचत होईल, असे त्यांनी सांगितले.

22 JUN 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : १) शिवाजी विद्यापीठात योग प्रात्यक्षिकांमध्ये सहभागी खा. धनंजय महाडिक, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. २) गोकुळतर्फे योग दिनानिमित्त योग प्रात्याक्षिके करताना गोकुळचे चेअरमन नविद मुश्रीफ, विश्वास पाटील व अरुण डोंगळे, अजित नरके, शशिकांत पाटील-चुयेकर आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)

# सकारात्मक ऊर्जाप्राप्तीसाठी योगसाधना आवश्यक

## खा. धनंजय महाडिक; शिवाजी विद्यापीठात 'योग-संगम'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सकारात्मक ऊर्जाप्राप्तीसाठी योगसाधना आवश्यक आहे. त्यादृष्टीने भारताच्या पुढाकाराने ११ वर्षांपूर्वी सुरू झालेला आंतरराष्ट्रीय योग दिन सर्वच देशांमध्ये उत्साहाने साजरा केला जात आहे. ही अभिमानाची बाब आहे, असे उद्‌गार खा. धनंजय महाडिक यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठात ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त 'योग-संगम' कार्यक्रम झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. यासाठी ६५० योगसाधक सहभागी झाले होते.

विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये सकाळी ६.१५ ते ८.१५ या कालावधीत योगसाधना शिबिर पार पडले. खा. महाडिक यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी वाहून कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पवार शिबिरात सहभागी झाले होते. योगशिक्षक दत्ता पाटील, सूरज पाटील, वीणा मालडीकर आणि आसावरी कागवाडे यांनी उपस्थितांना योगसाधनेचे प्रशिक्षण दिले.

### 'गोकुळ'मध्ये जागतिक योग दिन

योग संपन्न कर्मचारी गोकुळच्या यशाची गुरुकिल्ली आहे, असा विश्वास गोकुळचे चेअरमन नविद मुश्रीफ यांनी व्यक्त केला. संघाच्या ताराबाई पार्क कार्यालयाच्या प्रांगणात नविद मुश्रीफ, माजी चेअरमन विश्वास पाटील, अरुण डोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली व संचालकांच्या उपस्थितीत योगदिन साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. योग शिक्षक अशोक पालकर यांनी योगाचे महत्त्व सांगून प्रात्यक्षिके करून दाखवली. योग दिन शिबिरात वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांची नात व चेअरमन नविद मुश्रीफ यांची कन्या आऐझा मुश्रीफ हिने सहभाग घेतला.

यावेळी संचालक अजित नरके, शशिकांत पाटील, संभाजी पाटील, प्रकाश पाटील, सुजित मिणचेकर, बाळासो खाडे, कार्यकारी संचालक डॉ.योगेश गोडबोले, अनिल चौधरी, प्रदीप पाटील, योग शिक्षक डॉ. विलासराव देशमुख, मारुती शिंदे, बाजीराव पाटील, जनसंपर्क अधिकारी सचिन पाटील उपस्थित होते.

सूत्रसंचालन डॉ. एम. पी. पाटील यांनी केले. आभार डेअरी महाव्यवस्थापक अनिल चौधरी यांनी मानले.

22 JUN 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शनिवारी आयोजित योग प्रात्यक्षिकांमध्ये खासदार धनंजय महाडिक, कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे सहभागी झाले.

# विद्यापीठात ६५० योगसाधकांचा 'योग-संगम'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ६५० योगसाधकांनी शनिवारी योग करत 'योग-संगम' कार्यक्रमाला बळ दिले. यावेळी खासदार धनंजय महाडिक, कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) विभाग, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग, विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्र, वृत्तपत्रविद्या आणि जनसंज्ञापन अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये सकाळी ६.१५ ते ८.१५ या कालावधीत योगसाधना पार पडली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्यासह विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय सेवक यांच्यासह नागरिक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. यावेळी विद्यापीठामध्ये योग शिबिराला नियमित उपस्थित राहणाऱ्या साधकांना प्रातिनिधिक स्वरूपात महाडिक यांच्या हस्ते योग मॅट देण्यात आले.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात योग दिन उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त 'योग–संगम' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. खासदार धनंजय महाडिक, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विशाखापट्टण् येथून देशाला संबोधित केले. त्याचे थेट प्रक्षेपण शिवाजी विद्यापीठात करण्यात आले.

सुमारे ६५० योगसाधकांनी नोंदणी करून सहभाग दर्शविला. विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग, विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्र, वृत्तपत्रविद्या आणि जनसंज्ञापन अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम मोठ्या साजरा करण्यात आला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठात संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेनुसार २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. पहिल्या आंतरराष्ट्रीय योग दिवसापासून सलग दैनंदिन स्वरुपात विद्यापीठात मोफत योग शिबीर घेतले जाते. या उपक्रमाचा दैनंदिन जवळपास २०० साधक लाभ घेतात. हा उपक्रम येथून पुढेही नित्य स्वरुपात सुरू राहील. त्याचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेवून आरोग्य जपावे, असे अवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले. योगशिक्षक दत्ता पाटील, सूरज पाटील,वीणा मालडीकर आणि आसावरी कागवाडे यांनी उपस्थितांना योगसाधनेचे प्रशिक्षण दिले. यावेळी प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

Times of India

22 JUN 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# International Yoga Day celebrated with great enthusiasm across state

Rahul.Gayakwad
@timesofindia.com

**Kolhapur:** International Yoga Day was celebrated across the state on Saturday with great zeal through various activities and yoga demonstrations. Yoga poses such as Tadasana, Vrikshasana, Bhujangasana, Vajrasana, and Ardha Halasana were performed, along with pranayama and meditation.

In Kolhapur city, yoga sessions took place at schools, colleges, the university, parks in the city, govt offices, the collector's office, Rankala lake, and other locations. A special Yoga Day event called 'Times of Yoga' was organised jointly by The Times of India and Shantiniketan School on the school campus on Saturday morning. Hundreds of school students participated in the yoga session, performing several yoga poses on the occasion.

"Yoga is not just a routine but an integral part of a healthy lifestyle. All citizens, especially students, should practice yoga regularly," said district collector Amol Yedge. The collector spoke at the programme held at Mahasainik Darbar Hall, Kasba Bawda, in collaboration with the administration, the district sports council, the district sports officer's office, My Bharat, the Central Communications Bureau (Maharashtra-Goa), and Patanjali Yogpeeth.

On this occasion, the Common Yoga Protocol of the ministry of AYUSH and athletes from the district sports training centre presented yoga demonstrations.

A 'Yoga-Sangam' programme was organised at Shivaji University on the occasion of the 11th International Yoga Day on Saturday. Rajya Sabha MP Dhananjay Mahadik, SUK Vice-Chancellor D T Shirke, and Pro Vice-Chancellor Pramod Patil attended the event along with hundreds of other yoga enthusiasts.

"Yoga practice is essential for gaining positive energy, and in this regard, International Yoga Day, which started 11 years ago, is being celebrated with great enthusiasm in almost all countries. This is a matter of pride," said MP Dhananjay Mahadik. Meanwhile, Patanjali Yoga Samiti Kolhapur carried out Yog Sadhana activities at 250 different places in Kolhapur city and the district, including schools, colleges, and tehsil places. On behalf of BJP in Kolhapur, Shivaji Peth Dakshin Mandal, Patanjali Varg, and Khan Vihar Mitra Mandal, water yoga demonstrations were performed in the quarry adjacent to Rankala Lake on Saturday at 7.30 am.





(Top) Students participate in the Yoga Day session held at Shantiniketan High School, in association with The Times of India, in Kolhapur on Saturday morning. (Above) A large number of people take part in a yoga session at the historic Bibi Ka Maqbara in Chhatrapati Sambhajinagar on Saturday. The session was organised by the district administration and ASI to mark International Yoga Day

जनसंपर्क कक्ष
22 JUN 2025
पुण्यनगरी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. शिर्के उत्तम संख्याशास्त्रज्ञ, विद्यार्थीप्रिय शिक्षक

## देश-विदेशांतील संख्याशास्त्रज्ञांकडून कुलगुरूंच्या शैक्षणिक कारकीर्दीचा गौरव

कोल्हापूर : प्रतिनिधी

समस्या सोडवण्याला प्राधान्य देणारा उत्तम संख्याशास्त्रज्ञ, तंत्रज्ञानाभिमुख, विद्यार्थीप्रिय शिक्षक, कुलगुरुपदापर्यंत झेप घेऊनही जमिनीशी घट्ट राहणारा प्रशासक अशा स्तुतिसुमनांचा वर्षाव करत देश-विदेशातील संख्याशास्त्रज्ञांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू तथा ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. दिगंबर शिर्के यांच्या शैक्षणिक व संशोधकीय कारकीर्दीचा गौरव केला. विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेतील अखेरचे सत्र हे डॉ. शिर्के यांच्या सन्मानार्थ आयोजित करण्यात आले. त्यात



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचा आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेत सत्कार करताना प्रा. आर. एन. रट्टीहळ्ळी. सोबत मान्यवर.

देश-विदेशातील संख्याशास्त्रज्ञांनी डॉ. शिर्के यांच्यासमवेत असणाऱ्या सहसंबंधांना उजाळा दिला. डॉ. सुनीता शिर्के आणि संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक मंचावर उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगतात प्रा. रट्टीहळ्ळी म्हणाले, डॉ. शिर्के अतिशय जागरूक विद्यार्थी होते. पुढे जाऊन ते एक उत्तम शिक्षक, संशोधक बनले यात आश्चर्य नाही. संख्याशास्त्र अधिविभागाला त्यांनी खूप मोठी अकादमिक उंची प्राप्त करून दिली. सत्काराला उत्तर देताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, माझ्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मला चांगले मार्गदर्शक शिक्षक मिळाले. या मातृसंस्थेच्या ऋणातून उतराई होणे अशक्य आहे. यावेळी अमेरिकेतील मिसीसिपी स्टेट विद्यापीठाचे प्रा. प्रकाश पाटील, ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ अनिल गोरे, शिवाजी पाटील, शिवाजी डिसले, डी. जी. गोडसे, दिनेश हेलवाडे, मधुसूदन अडकी, बी. व्ही. धांद्रा, एन. बाळकृष्ण, टी. व्ही. रामनाथन, सुब्रमण्यम, के. मुरलीधरन, शिरीष शेवडे, व्ही. बी. घुटे, एल. आर. शिंदे, एस. रवी, संजय शेटे, आशीष सेनगुप्ता, एच. व्ही. कुलकर्णी, दत्तात्रय काशीद यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास डॉ. शिर्के यांचे कुटुंबीय उपस्थित होते. डॉ. सुकुमार राजगुरू यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 JUN 2025

तरूण भारत

# कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्या कारकिर्दीचा गौरव

## शिवाजी विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेचा समारोप : मान्यवरांची उपस्थिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात सुरु असलेल्या आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेमधील अखेरच्या सत्रात कुलगुरू कुलगुरू तथा ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. दिगंबर शिर्के यांच्या शैक्षणिक आणि संशोधकीय कारकिर्दीचा गौरव केला. देशविदेशातील संख्याशास्त्रज्ञांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या कार्याचा आढावा घेत स्तुतीसुमनांचा वर्षाव केला.

कुलगुरू डॉ. शिर्के हे ३० जून रोजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे प्राध्यापक म्हणून नियत वयोमानानुसार निवृत्त होत आहेत. परिषदेमध्ये देशविदेशातील महत्त्वाच्या संख्याशास्त्रज्ञांनी डॉ. शिर्के यांच्यासमवेत असणाऱ्या सहसंबंधांना उजाळा देत त्यांच्या शैक्षणिक, संशोधकीय व प्रशासकीय योगदानाचा गौरव केला. गौरव समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ प्रा. आर. एन. रट्टीहळ्ळी होते. डॉ. सुनिता शिर्के आणि संख्याशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांची प्रमुख उपस्थिती होती.




**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचा आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेत सत्कार करताना प्रा. आर. एन. रट्टीहळ्ळी. सोबत डॉ. सुकुमार राजगुरू, डॉ. संजय गांजवे, डॉ. बी. व्ही. धांद्रा, डॉ. दत्तात्रय काशीद, डॉ. शशिभूषण महाडिक आदी.**

अमेरिकेतील मिसीसिपी स्टेट विद्यापीठाचे प्रा. प्रकाश पाटील म्हणाले, कुलगुरू असूनही कधी पदाचा बडेजाव न मिरविणारे, अत्यंत साधेपणाने आणि विनम्र भावाने सर्वांना भेटणारे असे हे भारतातले एक दुर्मिळ कुलगुरू आहेत. त्यांची शिकविण्याची, संवाद साधण्याची हातोटी खूप अनोखी आणि आत्मीय आहे. ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे म्हणाले, डॉ. शिर्के यांनी शैक्षणिक धोरणांसंदर्भात काम करीत असताना जी अकादमिक उंची गाठली. अत्यंत कर्तव्यतत्पर शिक्षक, संशोधक आणि प्रशासक असल्याचे सांगितले.

प्रा. रट्टीहळ्ळी म्हणाले, डॉ. शिर्के यांच्या रुपाने विद्यापीठात पहिला आलेला विद्यार्थी संख्याशास्त्र विभागात एम.एस्सी.साठी प्रवेश घेतो, हीच बाब त्यावेळी आमच्यासाठी अभिमानास्पद होती. ही बाब गुणवत्तेच्या बळावरच आम्हाला पुढे सिद्ध करावयाची होती. संख्याशास्त्र अधिविभागाला त्यांनी खूप मोठी अकादमिक उंची प्राप्त करून दिली आहे. गौरवपर भाषणात अनेकांनी डॉ. शिर्के यांच्या व्यक्तीमत्वाचा उल्लेख केला.

यावेळी डॉ. शिवाजी पाटील, डॉ. शिवाजी डिसले, डी. जी. गोडसे, दिनेश हेलवाडे, रिझर्व्ह बँकेचे मधुसूदन अडकी, प्रा. बी. व्ही. धांद्रा, आयआयटी–तिरुपतीचे प्रा. एन. बाळकृष्ण, पंजाबच्या प्लाक्ष विद्यापीठाचे प्रा. टी.व्ही. रामनाथन, आयआयटी–मुंबईचे प्रा. सुब्रमण्यम, गुजरातचे प्रा. के. मुरलीधरन, आयआयएससी– बेंगलोरचे प्रा. शिरीष शेवडे, डॉ. शशीभूषण महाडिकडॉ. सुकुमार राजगुरू, डॉ. सोमनाथ पवार आदी उपस्थित होते.

22 JUN 2025 पुढारी


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उपलब्ध माहितीच्या विश्लेषणासाठी तज्ज्ञांची गरज

## शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेतील सूर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

एकविसाव्या शतकात डेटा प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहे. तितक्याच मोठ्या प्रमाणात त्याच्या गतिमान संख्याशास्त्रीय विश्लेषणाचीही आवश्यकता आहे. समाजाच्या समस्या मोठ्या आहेत. त्या सोडविण्यासाठी या क्षेत्रामध्ये सामाजिक जाणिवेच्या भावनेतून, आधुनिक ज्ञानसाधनांच्या आधारे काम करणाऱ्या संशोधक, विश्लेषकांची मोठी गरज आहे. संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी त्यासाठी सुसज्ज व्हावे, असा सूर शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेत उमटला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेत समारोप सत्रात बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. रिझर्व्ह बँकेच्या सोनाली अडकी, मधुसूदन अडकी, शिवाजी पाटील, वेदांत कोंडकर, जयप्रकाश होनराव. (छाया : अर्जुन टाकळकर)**

विद्यापीठात 'स्टॅटिस्टिकल मेथडस्, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' या व्यापक विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेची शनिवारी सांगता झाली. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. परिषदेमध्ये अमेरिका, मलेशिया, ग्रीस या देशांसह भारतभरातील विविध विद्यापीठांमधून संख्याशास्त्रज्ञ, संशोधक, शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले. या परिषदेत विविध सत्रांमध्ये आधुनिक संख्याशास्त्राशी निगडित अनेकविध विषयांवर सूक्ष्म चर्चा करण्यात आली. डॉ. प्रकाश पाटील, डॉ. अनिल गोरे, डॉ. आर. एन. रट्टीहळ्ळी आदी ज्येष्ठ तज्ज्ञांनी विविध सामाजिक-आर्थिक समस्यांची निवड करून त्या सोडवून समाजस्वास्थ्य सुधारण्यासाठी संख्याशास्त्राची उपाययोजना कशी करावी, याविषयी सखोल मार्गदर्शन केले. दरम्यान, २० जून रोजी सायंकाळच्या सत्रात देशविदेशांतील पाहुण्यांसाठी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 JUN 2025
पुण्यनगरी

# उपलब्ध माहितीच्या विश्लेषणासाठी तज्ज्ञांची गरज

## विद्यापीठात आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेत सूर

कोल्हापूर : एकविसाव्या शतकात डेटा प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहे, तितक्याच मोठ्या प्रमाणात त्याच्या गतिमान संख्याशास्त्रीय विश्लेषणाचीही आवश्यकता आहे. समाजाच्या समस्याही मोठ्या आहेत. त्या सोडविण्यासाठी या क्षेत्रामध्ये सामाजिक जाणीवेच्या भावनेतून, आधुनिक ज्ञानसाधनांच्या आधारे काम करणाऱ्या संशोधक, विश्लेषकांची मोठी गरज आहे. संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी त्यासाठी सुसज्ज व्हावे, असा सूर शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेत उमटला.



कोल्हापूर : चर्चासत्रात बोलताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत मान्यवर.

विद्यापीठात १९ जूनपासून 'स्टॅटिस्टिकल मेथडस्, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' या व्यापक विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषद सुरू होती. शनिवारी तिची प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सांगता झाली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते.

परिषदेमध्ये अमेरिका, मलेशिया, ग्रीस या देशांसह भारतातील विविध विद्यापीठांमधून संख्याशास्त्रज्ञ, संशोधक, शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले. तज्ज्ञ मार्गदर्शकांबरोबरच शासकीय सेवेत कार्यरत वरिष्ठ अधिकारी, रिझर्व्ह बँक, उद्योग, व्यवसाय, फायनान्स, इकॉनॉमिक्स, वैद्यकीय, अभियांत्रिकी इत्यादी क्षेत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्या तज्ज्ञांनीही आपापल्या अनुभवातून संख्याशास्त्राची भावी दिशा कशा स्वरूपाची असेल आणि त्यामध्ये संधी मिळविण्यासाठी कोणत्या प्रकारची तयारी करावी लागेल, या दृष्टीने मांडणी केली. डॉ. प्रकाश पाटील, डॉ. अनिल गोरे, डॉ. आर. एन. रट्टीहळ्ळी आदी ज्येष्ठ तज्ज्ञांनी विविध सामाजिक-आर्थिक समस्यांची निवड करून त्या सोडवून समाजस्वास्थ्य सुधारण्यासाठी संख्याशास्त्राचे उपयोजन कसे करावे, याविषयी मार्गदर्शन केले. परिषदेमध्ये विविध विषयांवर तपशीलवार चर्चा करण्यात आली. विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले.

22 JUN 2025 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गतिमान संख्याशास्त्र विश्लेषणासाठी सज्ज व्हा

## तज्ज्ञांचा सूर : आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेचा समारोप

कोल्हापूर, ता. २१ : 'गतिमान संख्याशास्त्रीय विश्लेषणासाठी संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी सज्ज राहावे. एकविसाव्या शतकात डेटा प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहे. सामाजिक जाणिवेच्या भावनेतून आधुनिक ज्ञानसाधनांच्या आधारे त्याचे विश्लेषण करण्याची गरज आहे. त्यातून समाजाच्या समस्या सोडविण्यास मदत होईल', असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेच्या समारोपात उमटला.

'स्टॅटिस्टिकल मेथड्स, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' विषयावर ही परिषद होती. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. अमेरिका, मलेशिया, ग्रीससह भारतातील विविध विद्यापीठांतील संख्याशास्त्रज्ञ, संशोधक, शिक्षक, विद्यार्थ्यांनी त्यात सहभाग घेतला. राजर्षी शाहू सभागृहात परिषद झाली. यावेळी डॉ. प्रकाश पाटील, डॉ. अनिल गोरे, डॉ. आर. एन. रट्टीहळ्ळी यांनी विविध सामाजिक-आर्थिक समस्यांची निवड करून त्या सोडवून समाजस्वास्थ्य सुधारण्यासाठी संख्याशास्त्राचे उपयोजन कसे करावे, याविषयी मार्गदर्शन केले. आधुनिक संख्याशास्त्राशी निगडित अनेक विषयांवर सूक्ष्म चर्चा झाली. शासकीय सेवेत कार्यरत वरिष्ठ अधिकारी, रिझर्व्ह बँक, उद्योग, व्यवसाय, फायनान्स, इकॉनॉमिक्स, वैद्यकीय, अभियांत्रिकी क्षेत्रांत कार्यरत तज्ज्ञांनी आपापल्या अनुभवांतून संख्याशास्त्राची भावी दिशा कशी असेल व त्यात संधी मिळविण्यासाठी कोणत्या प्रकारची तयारी करावी लागेल, यादृष्टीने मांडणी केली. संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
22 JUN 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. अभय बंग यांच्या 'सर्च' समवेत विद्यापीठाचा सामंजस्य करार

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. अभय बंग यांच्या गडचिरोली येथील सोसायटी फॉर एज्युकेशन, ॲक्शन ॲंड रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ (सर्च) या संस्थेसमवेत झालेला सामंजस्य करार हा शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात मैलाचा दगड ठरेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली. 'सर्च'चे अध्यक्ष डॉ. अभय बंग यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजी विद्यापीठ आणि सर्च यांच्यात सामाजिक संशोधनविषयक झालेल्या सामंजस्य करारप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. बंग हे महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या कृतीशील कार्याचा वारसा पुढे नेत 'सर्च'ची स्थापना केली आहे. तेथे अनेक सामाजिक, आरोग्यविषयक प्रश्नांवर व्यापक आणि सूक्ष्म अध्ययन व संशोधन केले जाते. शिवाजी विद्यापीठातील शिक्षक आणि विद्यार्थी यांनी सर्वप्रथम 'सर्च'ची कार्यप्रणाली समजावून घेण्यास प्राधान्य द्यावे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि सर्च यांच्यादरम्यान झालेल्या सामंजस्य कराराच्या प्रतींचे हस्तांतर करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि डॉ. अभय बंग. सोबत डॉ. सागर डेळेकर, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रमोद पाटील आदी.

डॉ. बंग म्हणाले, शिवाजी विद्यापीठ आणि गडचिरोली येथील सर्च यांचे एकत्र येणे आनंददायी आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने आता शैक्षणिक संस्थांना विविध सामाजिक समस्यांवर लक्ष केंद्रित करण्याची दिशा व दृष्टी दिली आहे. त्यामुळे नागरिकांना प्रत्यक्ष जीवनात भेडसावणाऱ्या समस्यांवर काम करणे शक्य होणार आहे. यावेळी डॉ. बंग आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सागर डेळेकर यांनी आभार मानले. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. नितीन माळी, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते.

लोकमत

# २६ अभ्यासक्रमांच्या जागा रिक्त, १० जुलैला पुनर्प्रवेश परीक्षा

## शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ अधिविभाग व संलग्न महाविद्यालयाकडील पदव्युत्तर २६ अभ्यासक्रमांच्या पुनर्प्रवेश परीक्षा येत्या १० जुलैला तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित केली आहे. यासाठी विद्यार्थ्यांना आज रविवार ते ५ जुलैपर्यंत अर्ज भरता येणार आहेत.

विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया घेऊन त्याच्या प्रवेशाच्या तिन्ही फेरी पूर्ण झाल्या. मात्र, विद्यार्थ्यांचा अपेक्षित प्रवेश झाला नाही. त्यात ऑनलाइन अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी अनेक चुका केल्याने बहुतांश विद्यार्थ्यांचे प्रवेश होऊ शकले नाहीत. त्यामुळे काही अभ्यासक्रमांचे प्रवेश ऑफलाइनही करण्यात आले. विद्यापीठ स्तरावरील एम.एस्सी. फिजिक्स, एम.एस्सी. प्राणिशास्त्र, एम.एस्सी. वनस्पतिशास्त्र, एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स यासह २६ अभ्यासक्रमांच्या जागा रिक्त राहिल्या आहेत. दरम्यान, प्रवेश परीक्षा नसलेल्या अभ्यासक्रमांना प्रवेश अर्ज भरण्यासाठीची मुदत ३० जूनपर्यंत वाढवण्यात आली आहे.

## का राहिल्या जागा रिक्त

**ऑनलाईन प्रवेश परीक्षा प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली. पसंतीक्रमांक देताना विद्यार्थी चुकल्याने अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश होऊ शकले नाहीत.**

पुढारी

# विद्यापीठाकडून १० जुलै रोजी २६ अभ्यासक्रमांच्या पुनर्प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ अधिविभाग व संलग्न महाविद्यालयाकडील पदव्युत्तर २६ अभ्यासक्रमांच्या पुनर्प्रवेश परीक्षा १० जुलै रोजी तंत्रज्ञान अधिविभागात होणार आहेत. यासाठी विद्यार्थ्यांना ५ जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहेत.

विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया घेऊन तिन्ही फेरी पूर्ण झाल्या आहेत. मात्र, अपेक्षित प्रवेश झाले नाहीत. त्यात ऑनलाईन अर्ज भरताना चुका केल्याने विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले नाहीत. काही अभ्यासक्रमांचे प्रवेश ऑफलाईन करण्यात आले. एम.एस्सी. फिजिक्स, एम.एस्सी. प्राणीशास्त्र, एम.एस्सी. वनस्पतीशास्त्र, एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स यासह २६ अभ्यासक्रमांच्या जागा रिक्त राहिल्याने पुनर्प्रवेश परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे.

22 JUN 2025 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदव्युत्तर २६ अभ्यासक्रमांच्या पुनर्प्रवेश परीक्षा १० जुलैला

## आजपासून अर्ज भरण्यास प्रारंभ

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ अधिविभाग व संलग्न महाविद्यालयाकडील पदव्युत्तर २६ अभ्यासक्रमांच्या पुनर्प्रवेश परीक्षा येत्या १० जुलैला तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित केली आहे. यासाठी विद्यार्थ्यांना २२ जून ते ५ जुलैपर्यंत अर्ज भरता येणार आहेत.

विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया घेऊन त्याच्या प्रवेशाच्या तिन्ही फेरी पूर्ण झाल्या. मात्र, विद्यार्थ्यांचा अपेक्षित प्रवेश झाला नाही. त्यात ऑनलाईन अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी अनेक चुका केल्याने बहुतांश विद्यार्थ्यांचे प्रवेश होऊ शकले नाहीत. त्यामुळे काही अभ्यासक्रमांचे प्रवेश ऑफलाईनही करण्यात आले.


विद्यापीठ स्तरावरील एम.एस्सी. फिजिक्स, एम. एस्सी. प्राणीशास्त्र, एम.एस्सी. वनस्पतीशास्त्र, एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स यासह २६ अभ्यासक्रमांच्या जागा रिक्त राहिल्याने विद्यापीठाने या अभ्यासक्रमांसाठी पुनर्प्रवेश परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, प्रवेश परीक्षा नसलेल्या अभ्यासक्रमांना प्रवेश अर्ज भरण्यासाठीची मुदत ३० जूनपर्यंत वाढवण्यात आली आहे

पुढारी

# 'दूरशिक्षण' फेर प्रवेश परीक्षेसाठी अर्जाची ७ जुलैपर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्राच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष (रिक्त जागाकरिता) फेर प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना ७ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्जाची मुदत आहे.एमएचटी-सीईटी, एटीएमए अथवा भारत सरकारच्या कोणत्याही वैधानिक संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थांना एमबीएस (डिस्टन्स मोड) अभ्यासक्रमास थेट प्रवेश घेता येणार आहे. त्यांना फेर प्रवेश देण्याची आवश्यकता नाही. डिस्टन्स मोडची फेर प्रवेश परीक्षा १३ जुलै रोजी दूरशिक्षण व ऑनलाईंन शिक्षण केंद्र, कोल्हापूर येथे होणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

सकाळ



कोल्हापूर : 'अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया' विषयावरील सेमिनारमध्ये बोलताना प्रा. डॉ. अजित कोळेकर.

# अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया सेमिनारला विद्यापीठात प्रतिसाद

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया विषयावरील सेमिनारला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अभियांत्रिकी पदवी प्रथम व द्वितीय वर्ष व पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्याचे आयोजन केले होते. तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहात सेमिनार झाला. यावेळी विभागातील प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल अधिकारी डॉ. गणेश पाटील यांनी अभियांत्रिकी म्हणजे काय, अभ्यासक्रमाचे स्वरूप, विविध शाखा, शाखांची निवड कशी करावी, कागदपत्रे याविषयी मार्गदर्शन केले.

अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. अजित कोळेकर यांनी विविध शाखांची माहिती देत योग्य अभ्यासक्रम व शिक्षण संस्था करियरसाठी कोणत्या निवडाव्यात, याविषयी माहिती दिली. विविध शाखांचे पीएच.डी. अभ्यासक्रम उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

22 JUN 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# अभियांत्रिकी प्रवेश फेऱ्यांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातर्फे शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अभियांत्रिकी पदवी (प्रथम व द्वितीय वर्ष) व पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. तंत्रज्ञान अधिविभागीतल सभागृहात हा कार्यक्रम झाला. अभियांत्रिकी पदवी व पदव्युत्तर प्रवेश प्रक्रिया ही केंद्रीभूत प्रवेश पद्धतीने केली जाते, त्यामुळे ही प्रवेश प्रक्रिया अभियांत्रिकी इच्छुक विद्यार्थी व पालकांना या प्रवेश प्रक्रियेची माहिती दिली.

प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल अधिकारी डॉ. गणेश पाटील यांनी विद्यार्थी व पालकांना अभियांत्रिकी म्हणजे काय, अभ्यासक्रमाचे स्वरूप, विविध शाखा, शाखांची निवड कशी करावी, राज्यातील सरकारी व खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयाकरिता राबवण्यात येणारी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया (कॅप) मधील अर्ज करण्याची पद्धत, महाविद्यालय पसंती क्रमांक, जागावाटप या संदर्भातील संपूर्ण माहिती तसेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, त्या अनुषंगाने होणारे बदल, भविष्यात असणाऱ्या रोजगार संधी, उच्च शिक्षणाच्या संधी, विविध स्कॉलरशिप, विद्यापीठाच्या विविध योजना, सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी फी सवलत व मोफत वसतिगृह योजना याविषयी मार्गदर्शन, तसेच लागणारी कागदपत्रे व प्रवेश प्रक्रियेचे स्वरूप याविषयीची समग्र माहिती दिली. विद्यार्थी व पालकांच्या शंकांचे निरसन केले.

तंत्रज्ञान अधिविभागाचे प्रसंचालक प्रा. डॉ. अजित कोळेकर म्हणाले, विद्यार्थ्यांना सक्षम अभियंता बनण्यासाठी तांत्रिक ज्ञान व कौशल्य विकासाची गरज असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी योग्य अभ्यासक्रम व शिक्षणसंस्था करिअरसाठी निवडाव्यात. तंत्रज्ञान अधिविभागामध्ये अभियांत्रिकी क्षेत्रामधील विविध शाखांचे शिक्षण दिले जाते. कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनीरिंग, फूड टेक्नॉलॉजी, केमिकल इंजिनीरिंग, सिव्हिल इंजिनीरिंग आणि मेकॅनिकल इंजिनीरिंग या शाखांचा समावेश आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनीरिंग, फूड टेक्नॉलॉजी, एनर्जी टेक्नॉलॉजी, एनव्हायरमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी या शाखांचा समावेश आहे. येथे पी. एच.डी. अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत. विद्यार्थी व पालकांनी शिबिरात सहभाग नोंदवला. शिवाजी विद्यापीठातील प्लेसमेंट सेलचे यश, परदेशी गेलेले विद्यार्थी, स्पोर्ट्समध्ये मिळवलेले यश आदीची विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. सूत्रसंचालन प्रा. हर्षवर्धन पंडित यांनी केले.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभागाचे क्रीडा स्पर्धेत यश

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी लीड कॉलेजसह विद्यापीठस्तरावरील विविध स्पर्धांत दमदार यश मिळवले.

नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत ऋचा पाटील हिने सुवर्ण, तर धैर्यशील भोसले याने विजयदुर्ग येथे झालेल्या खुल्या समुद्र जलतरण स्पर्धेत पाच कि.मी. अंतर स्पर्धेत रौप्यपदकाची कमाई केली. यासह त्याने केआयटी कॉलेज लीड कॉलेज जलतरण स्पर्धेत ५० मीटर चार प्रकारांत तीन सुवर्ण, एक रौप्य अशा चार पदकांची कमाई केली. डॉ. डी.वाय.पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत तंत्रज्ञान विभागाने नऊ सुवर्ण, पाच रौप्य आणि एक कांस्य अशा पंधरा पदकांची कमाई केली. यासह डीकेकेटीई, इचलकरंजीतर्फे आयोजित खो-खो, ए.डी. शिंदे आभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे आयोजित व्हॉलीबॉल स्पर्धेत, तर डीआरके कॉलेजतर्फे आयोजित बुद्धिबळ स्पर्धेत मुलींच्या संघाने यश मिळवले. सर्व खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रोत्साहन, तर क्रीडा समन्वयक प्रवीण सावंत, प्रभारी संचालक डॉ. ए. बी. कोळेकर आदींचे मार्गदर्शन लाभले.

महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज

22 JUN 2025




# सकारात्मक ऊर्जाप्राप्तीसाठी योगसाधना आवश्यक : खासदार धनंजय महाडिक

## शिवाजी विद्यापीठात ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त 'योग–संगम' कार्यक्रम

**कोल्हापूर (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज ):**

सकारात्मक ऊर्जाप्राप्तीसाठी योगसाधना आवश्यक असून त्या दृष्टीने भारताच्या पुढाकाराने ११ वर्षांपूर्वी सुरू झालेला आंतरराष्ट्रीय योग दिन आज जगातील जवळपास सर्वच देशांमध्ये मोठ्या उत्साहाने साजरा केला जात आहे. ही अभिमानाची बाब आहे, असे उद्गार खासदार धनंजय महाडिक यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठात आज ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त 'योग-संगम' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यावेळी उपस्थितांना संबोधित करताना खासदार महाडिक बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.



भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाद्वारे ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त 'योग संगम' हा उपक्रम देशभरात साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमात शिवाजी विद्यापीठ सहभागी झाले. यासाठी सुमारे ६५० योगसाधकांनी नोंदणी केली आणि आजच्या उपक्रमात सहभागही दर्शविला. विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) विभाग, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग, विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्र, वृत्तपत्रविद्या आणि जनसंज्ञापन अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठात संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेनुसार २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. पहिल्या आंतरराष्ट्रीय योग दिनापासून अर्थात दि. २१ जून २०१५ पासून येथे ११ वर्षे सलग दैनंदिन स्वरूपात विद्यापीठात मोफत योग शिबीर घेतले जाते. या उपक्रमाचा दैनंदिन जवळपास २०० साधक लाभ घेतात. हा उपक्रम येथून पुढेही नित्य स्वरूपात सुरू राहील. त्याचा शहरातील जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा आणि आपले आरोग्य जपावे, असे आवाहन त्यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये आज सकाळी ६.१५ ते ८.१५ या कालावधीत योगसाधना शिबीर पार पडले. खासदार महाडिक यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यविज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पवार यांच्यासह विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय सेवक यांच्यासह नागरिक, विद्यार्थी-विद्यार्थिनी, राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी या योगसाधना शिबिरात सहभागी झाले. योगशिक्षक दत्ता पाटील, सूरज पाटील, दीपा [illegible] आणि [illegible] यांनी उपस्थितांना योगासनांचे प्रशिक्षण दिले.

या उपक्रमाचे विद्यापीठाच्या शिव-वार्ता वाहिनीद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात आले. यावेळी विद्यापीठामध्ये योग शिबिराला नियमित उपस्थित राहणाऱ्या साधकांना प्रातिनिधिक स्वरूपात श्री. महाडिक यांच्या हस्ते योग मॅट देण्यात आले. स्वागत व प्रास्ताविकाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संबोधनाचे प्रक्षेपण**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विशाखापट्टणम् येथून संपूर्ण देशाला संबोधित केले. त्या अंतर्गत एक पृथ्वी एक आरोग्य [illegible] योगाचे आहे. आरोग्यपूर्ण जीवनासाठी दैनंदिन योग करणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या [illegible] दर रोज अर्धा तास जरी योग केले, तरी आरोग्य उत्तम राहील. त्याचप्रमाणे आहारात आणि तेलाचे प्रमाण थोडी कमी सुद्धा होईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. पंतप्रधान मोदी यांच्या या संबोधनाचे थेट प्रक्षेपण यावेळी सभागृहात करण्यात आले. त्यानंतर [illegible] योग प्रात्यक्षिकांना सुरुवात झाली.